# VPM's

# Maharshi Parshuram College of Engineering,

# Velneshwar

## 7.1.7. Tree Plantation




TEACHERS DAY

**“Tarun Bharat Newspaper” on 05/09/2018**

# वेळणेश्वर अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षक दिन

## इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभागातर्फे वृक्षारोपण

गुहागर (शहर वार्ताहर)

तालुक्यातील महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय वेळणेश्वर येथे शिक्षक दिन विविध विभागातर्फे उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वयंशासन दिवसही साजरा केला. विद्यार्थी शिक्षकाच्या भूमिकेत दिसत होते.

शिक्षक हा समाज परिवर्तन करणारा घटक आहे. आज शिक्षणाचे अवमूल्यन केले जात असल्याचे चित्र समाजात दिसत आहे. तसेच गुरू-शिष्य संबंधांमधील पवित्र भावना लोप पावत आहे. शिक्षकांच्या भूमिकेचे महत्त्व आणि भविष्यातील पिढ्यांच्या जागरूकतेसाठी व डॉ. राधाकृष्णन् यांच्या स्मृती जागृत करण्याकरीता शिक्षक दिन हा मोठ्या दिमाखात साजरा केला जातो. याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयातील इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभागातर्फे विद्यार्थी वर्गाचे फीत कापून उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी गुरूजन शिक्षक वर्गास पुष्पगुच्छ देऊन त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. त्यानंतर शिक्षक व विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी मुलांनी शिक्षकांसाठी बनविलेली चित्रफित व मुलांची हास्यविनोदी चित्रफित उपस्थितांना दाखविण्यात आली. तसेच महाविद्यालय परिसरात इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभागातर्फे विविध जातीच्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



**महाविद्यालयीन परिसरात वृक्षारोपण करताना इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभागाचे विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी.**











